**<u>सं.फौ.ख.क्रं.२३९६/२०१९</u>**
अंतरिक्ष वि. बंडु
**निशाणी क्रमांक ६०**

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ ची साक्ष शपथेवर सुरु

नाव : **संगिता खंडु खोसे**
वय : ५६ वर्षे,
धंदा : शाखा व्यवस्थापक, जि एस महानगर को. ऑ. बँक, नागापूर,
राहणार : पाईपलाईन रोड, ता.जि.अहमदनगर.

**<u>सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.व्ही.खांदवे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. मला प्रस्तुत प्रकरणात साक्षीकामी समन्स मिळाले होते. त्याप्रमाणे मी आजरोजी आरोपीने आमच्या बँकेमध्ये दि.०२.०७.२०१५ रोजी खाते उघडल्याचा अर्ज व त्यासोबत असणारे कागदपत्रे सोबत आणलेली आहेत. आता मला मी न्यायालयात दाखल केलेल्या आरोपीच्या अर्जाची मुळ प्रतीवरून काढण्यात आलेली सत्यप्रत दाखविणेत आली. सदर अर्जाची मुळ प्रत देखिल मी आजरोजी न्यायालयात आणलेली आहे. मी आजरोजी न्यायालयात दाखल केलेला दस्त/खाते उघडण्याचा अर्ज हा आरोपीने खाते उघडण्यासाठी केलेल्या अर्जाची सत्यप्रत असून त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरच्या अर्जाच्या सत्यप्रतीवर माझी सही आहे. त्यास **निशाणी ६१** देण्यात येते. निशाणी ६१ सोबत आम्ही आरोपीकडुन त्याचे आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, ग्रामपंचायतचा ना हरकत दाखला इ. दस्तांची छायांकित प्रत घेतली होती. नि. क्र. ६१ वरील अर्जावर खातेदार म्हणून बंडु शिवाजी बर्डे यांची सही आहे. सदरचे खाते हे बंडु शिवाजी बर्डे यांच्या सहीनेच खात्याचे संचलन होते.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. बी. अकोलकर यांचे मार्फत उलटतपास सुरु .</u>**

२. मी जि एस महानगर को. ऑ. बँक, नागापूर येथे शाखा व्यवस्थापक म्हणून मागिल दोन महिन्यांपासून काम पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि ६१ वरील अर्जाप्रमाणे माझे समक्ष सदरचे खाते सुरु झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बंडु शिवाजी बर्डे यांची व माझी ओळख नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, सदरची व्यक्ती आमची खातेदार असल्याने मी

त्यांना ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, नि क्र. ६१ सोबत आम्ही आरोपी हा पवनपुत्र दुध संकलन केंद्राचा प्रोपायटर असल्याबाबत कोणताही पुरावा घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा पवनपुत्र दुध संकलन केंद्राचा प्रोपायटर आहे किंवा कसे हे मी खात्रीशिर सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा पवनपुत्र दुध संकलन केंद्राशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि ६१ वरील अर्जामधील काही रकाणे भरलेले नाहीत. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, जे रकाणे आवश्यक आहेत ते भरलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अर्ज हा अपुर्ण आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या बँकेत कोणताही अर्ज दिलेला नसून त्याचे कोणतेही खाते उघडण्यात आलले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RENUKA RAMESH RAHATEKAR Digitally signed by RENUKA RAMESH RAHATEKAR Date: 2026.08.04 17:05:29 +0530

( **आर. आर. राहतेकर** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
**न्यायालय क्र.३, अहमदनगर**

दिनांकः ०४/०८/२०२६
अहमदनगर